# <u>प्रेसनोट</u>

नाशिक,
दि. ०१/१२/२०२३

**अनिलकुमार मनोहर सुपे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाढोली, ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक यांनी १,०४,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | सरकारवाडा पोलीस ठाणे गुरनं ३१२/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | अनिलकुमार मनोहर सुपे, वय ४६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - ग्रामसेवक ग्रामपंचायत वाढोली, ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०४,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,०४,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी ग्रामपंचायत वाढोली, ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक येथील ग्रामपंचायत रस्ता कॉंक्रिटीकरण करण्याच्या विहित कालावधी मध्ये पुर्ण केलेल्या कामाचे बाकी असलेले २,९९,७७६/- रुपये मिळणेकरीता ग्रामपंचायत वाढोली येथील आलोसे अनिलकुमार मनोहर सुपे, ग्रामसेवक ग्रामपंचायत वाढोली, ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक यांना भेटले असता आलोसे यांनी तक्रारदार यांनी यापुर्वी ग्रामपंचायत वाढोली येथे १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत येणा-या निधितुन केलेल्या काही विकास कामांचे ७०,०००/- रुपये बक्षिस स्वरूपात लाच म्हणुन तसेच वाढोली, ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक कडील ग्रामपंचायत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे या कामाचे देयक रुपये २,९९,७७६/- अदा करण्याचे मोबदल्यात लाच म्हणुन ३०,०००/- रूपये व सदर बाबत ऑडीट करणे कामी खर्च म्हणुन ४०००/- रूपये असे एकुण १,०४,०००/- रू लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे अनिलकुमार मनोहर सुपे, ग्रामसेवक ग्रामपंचायत वाढोली, ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे १,०४,०००/- रू रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि. ३०.११.२०२३ रोजी स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द सरकारवाडा पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गुरनं ३१२/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अन्वये दि. ०१.१२.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००


०१/१२/२३

( नरेंद्र भा.पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

पोलीस उपअधीक्षक/पोलीस अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो नाशिक परिक्षेत्र, नाशिक
सत्यमेव जयते